MHLA110003252025

**<u>नि.दि.दावा क्र.५५/२०२५ (शिवराज वि. बळीराम व इतर) मध्ये</u>**
**<u>नि.क्र.२४ वरील आदेश</u>**

१. अर्ज व नि.क्र.१९ वर दाखल म्हणणेचे अवलोकन केले. सदरचा अर्ज वादी व प्रतिवादी यांच्या जमिनीची मोजणी करणेकामी कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याकरीता वादीने दाखल केलेला आहे. यापुर्वी वादीने नि.क्र.१९ वर कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्याकरीता अर्ज दिला होता व तो मंजूर झाला होता. परंतु सदर अर्जामध्ये किरकोळ चुका असल्याने वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीचा अर्ज यापुर्वीच मंजूर झाला असल्यामुळे पुन्हा त्याचा उहापोह करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालील प्रमाणे सुधारीत आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि.क्र.२४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते.
३. कोर्ट कमिशनर यांनी मौजे तळेगाव (बोरी), ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथील संपूर्ण सर्वे/गट नं.१३७ व १३८ ची **मोजणी नियमावलीप्रमाणे** मोजणी करुन वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीचे क्षेत्र स्वतंत्र दर्शवून त्यांच्या जमिनीच्या हद्दी खुणा कायम करुन मोजणी नकाशासह अहवाल, मोजणी फी भरल्यानंतर दोन महिन्याच्या आत सादर करावा.
४. मोजणीच्या वेळी मिळकतीमध्ये अतिक्रमण आढळून आल्यास सदर अतिक्रमीत क्षेत्र नकाशामध्ये स्पष्टपणे दर्शवून कोर्ट कमिशनर यांनी अहवाल दाखल करावा.
५. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांना दावा मिळकतीची मोजणी करतेवेळी लगत सर्वे नंबरची मोजणी करणे आवश्यक असल्यास त्यांना तशी परवानगी देण्यात येत आहे.
६. कोर्ट कमिशनर यांनी पक्षकारांना आगाऊ नोटीस काढून मोजणीबाबतची कार्यवाही करावी.
७. संबंधीत पक्षकारांनी नियमाप्रमाणे संबंधित विभागाकडे मोजणी फी एक महिन्याचे आत भरुन पावतीची प्रत न्यायालयात दाखल करावे.
८. वर नमूद बाबीची पुर्तता झाल्यानंतर कोर्ट कमिशनरला पत्र द्यावे.

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.06.09 16:51:25 +0530

निलंगा.
दि.०९/०६/२०२६

**(श्रीमती व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.